महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440 022
दूरध्वनी क्र.0712- 2959381 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

कृपया प्रकाशनार्थ दिनांक : 20 ऑगस्ट 2025

# 'महाज्योती' येथे सद्भावना दिवस उत्साहात

## प्रतिज्ञेतून कर्मचाऱ्यांची घेतली राष्ट्रीय एकात्मतेची शपथ

महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर येथे बुधवार, दि. २० ऑगस्ट रोजी 'सद्भावना दिवस' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विविधतेतही ऐक्य, बंधुता आणि सौहार्द जोपासण्याचा संकल्प या दिनानिमित्ताने संस्थेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रतिज्ञेद्वारे व्यक्त केला. कार्यक्रमाचे मार्गदर्शन महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी केले. या कार्यक्रमाला मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशांत वावगे, प्रकल्प संचालक कुणाल शिरसाठे, प्रकल्प व्यवस्थापक विकास गडपायले, प्रकल्प अधिकारी धम्मा गजभिये, शुभम वैलथरे यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

आपल्या प्रेरणादायी भाषणात महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले की, आजच्या बदलत्या सामाजिक-सांस्कृतिक परिस्थितीत सद्भावना आणि राष्ट्रीय एकात्मता हा समाजजीवनाचा मूलाधार आहे. जात, धर्म, भाषा वा प्रांत यांच्या पलीकडे जाऊन प्रत्येक भारतीयामध्ये सौहार्द आणि सहकार्याची भावना प्रस्थापित होणे हीच खरी प्रगती आहे. संवाद, विचार-विनिमय आणि संविधानिक मूल्यांच्या आधारे मतभेद दूर केले, तर संस्थात्मक कार्य अधिक परिणामकारक ठरेल असेही मा. मिलिंद नारिंगे यांनी सांगितले.

. याप्रसंगी सर्व प्रकल्प अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एकमुखाने राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा घेतली. मी जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता सर्व भारतीय जनतेच्या भावनिक ऐक्यासाठी काम करीन. मी आणखी अशी प्रतिज्ञा करतो/करते की, आमच्यातील सर्व मतभेद मी हिंसाचाराचा अवलंब न करता विचारविनिमय आणि संविधानिक मार्गाने सोडवीन, अशी शपथ सर्वांनी घेतली. सर्वांनी एकत्र येऊन घेतलेल्या या प्रतिज्ञेमुळे एकात्मतेचा दृढ संदेश समाजापर्यंत पोहोचला. कार्यक्रमाच्या समारोपाच्या वेळी मान्यवरांनी असे मत व्यक्त केले की, सद्भावना दिवस ही केवळ एक औपचारिकता नसून दैनंदिन जीवनात शांतता, सौहार्द आणि बंधुता रुजवण्याचा संकल्प आहे. सहजीवन आणि समजूतदारीचा संदेश समाजात पसरवणे हीच खरी या दिवसाची सांगड आहे. महाज्योतीसारख्या शैक्षणिक व प्रशिक्षण संस्थेत 'सद्भावना दिवस' जल्लोषात साजरा झाल्याने राष्ट्रीय एकात्मता, समानता आणि सहजीवनाचा संदेश अधिक प्रभावीपणे जनमानसापर्यंत पोहोचला आहे. विविधतेत एकता जपण्याची परंपरा आणि भारतीय समाजातील ऐक्य दृढ करण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचेही मान्यवरांनी अधोरेखित केले.

प्रति,
१) मा. संपादक,प्रिंट, ईलेक्ट्रानिक, डिजीटल माध्यम
२) मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
३) मा.जिल्हा माहिती अधिकारी (सर्व जिल्हे)

मा. महोदय,
कृपया उपरोक्त वार्तांकनास आपल्या माध्यमात प्रसिद्धी करावे ही नम्र विनंती.

कुणाल शिरसाठे

प्रकल्प संचालक
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),
महाराष्ट्र राज्य, नागपूर